महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक:-१८ ऑगस्ट, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- गुणांच्या फेरपडताळणी (Retotalling) करीता अर्ज सादर करण्याबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित पुढील परीक्षांचे सुधारित निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहेत:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षेचे नाव |
|---|---|---|
| १ | ०७/२०१९ | राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१९ |
| २ | ०८/२०१९ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा २०१९-पोलीस उपनिरीक्षक |
| ३ | १२/२०१९ | महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०१९ |
| ४ | १७/२०१९ | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ |
| ५ | १८/२०१९ | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ |

२. उपरोक्त परीक्षांच्या सुधारित निकालास अनुसरुन शारीरिक चाचणीस/मुलाखतीस पात्र न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे मुख्य परीक्षेचे गुण आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील View Marksheet या वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, मुख्य परीक्षेतील गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणा-या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणा-या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(४) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(५) उपलब्ध होणा-या गुणपत्रातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करुन 'Save' बटनवर क्लिक करावे.

(६) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक **दिनांक २२ ऑगस्ट, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** सुरु राहील.

४. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा १८००-२६७३-८८९ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

ठिकाण:-मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग